रयत शिक्षण संस्था, सातारा.

इयत्ता - ७ वी | **प्रथम सत्र परीक्षा २०२२- २३** | गुण - ५०

वेळ - २.३० | **विषय - समाजशास्त्र** | पेजेस - ४

**सूचना:-** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

३) आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व नावे द्या.

४) प्रश्न क्रमांक १ ते ३ प्रश्न इतिहास व प्रश्न क्रमांक ४ व ५ नागरिकशास्त्र व प्रश्न क्रमांक ६ ते ९ भूगोगल या विषयांवरील आहेत.

## ( इतिहास )

**१. अ) लिहिते व्हा (एका वाक्यात उत्तरे लिहा.)** २

१) 'ताम्रपट' म्हणजे काय ?

२) खालसा दलाचे संस्थापक कोण होते ?

**ब) योग्य जोड्या जुळवा.** ३

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) मुघल सत्तेचा संस्थापक | अ) संत मीराबाई |
| २) कृष्ण भक्तीचा महिमा | ब) हसन गंगू |
| ३) बहमनी राज्याचा पहिला सुलतान | क) बाबर |
| | ड) शेरशहा |

**२. लिहिते व्हा. ( कोणतेही तीन )** ६

१) महाराष्ट्रातील चार परगण्यांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

२) गुरुनानकांनी आपल्या अनुयायांना कोणती शिकवण दिली ?

३) महमूद गावानने कोणत्या सुधारणा केल्या ?

४) शिवाजी महाराजांवर वीरमाता जिजाबाईंनी केलेले विविध संस्कार लिहा.

**३. का ते लिहा. ( कोणतेही २ )** ४

१) शिवरायांनी पुरंदरचा तह केला.

२) शिलालेख हा इतिहासलेखनाचा विश्वसनीय पुरावा मानला जातो.

३) दुष्काळ हे रयतेला मोठे संकट वाटत असे.

**४. थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतीही एक )** ३

१) शिवाजी महाराजांनी मूघलाविरूद्ध आक्रमक पवित्रा का घेतला ?

२) इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करा.

( नागरिकशास्त्र )


**५. अ) योग्य शब्द लिहा.** २

१) मसुदा समितीचे अध्यक्ष -


२) निवडणूक घेणारी यंत्रणा -

**ब) खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा. ( कोणतेही १ )** २

१)




२)




**६. लिहिते होऊ या. ( कोणतेही एक )** ३

१) स्वतंत्र न्यायव्यवस्थेचे फायदे व तोटे विषद करा.

२) समाजात व्यक्तिप्रतिष्ठा कशी निर्माण होईल ?

( भूगोल )

**६. अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** ३

१) पृथ्वीला परिवलनासाठी सुमारे .......... तास लागतात.

अ) १२ ब) २४ क) ४८

२) लाटेच्या निर्मितीचे मुख्य कारण .......... आहे.

अ) उष्णता ब) वारा क) खोली

३) हवेचा दाब .......... या परिमाणात सांगतात.

अ) मिलिबार ब) मिलीमीटर क) मिलिग्रॅम

**ब) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.** २

१) पृथ्वी स्वत:भोवती फिरताना पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते.

२) हवा प्रसारण पावली की नाहीशी होते.

**७. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही २ )** २

१) वाऱ्यांचे प्रमुख प्रकार कोणते ?

२) उधाणाची भरती -ओहोटी केव्हा येते ?

३) उष्ण वाळवंटी प्रदेशात कोणत्या वनस्पती आढळतात ?

**ब) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. ( कोणतेही २ )** ४

१) भरती-ओहोटीवर सूर्यापेक्षा चंद्राचा जास्त परिणाम होतो.

२) दर अमावास्या व पौर्णिमेस चंद्र, पृथ्वी, सूर्य एका सरळ रेषेत येत नाहीत.

३) हवेचा दाब उंचीनुसार कमी होतो.

४) विषुववृत्तीय वनातील वृक्ष उंच वाढतात.

**८. अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही २ )** ४

१) सूर्यग्रहण पाहताना कोणती काळजी घ्यावी लागते ?


२) हवेच्या दाबावर तापमानाचा कोणता परिणाम होतो ?

३) पृथ्वीच्या परिवलनाचा वाऱ्यावंर कोणता परिणाम होतो ?


४) हवा दाबमापकाविषयी थोडक्यात माहिती लिहा.

**ब) खालील आकृतीचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**( कोणतेही २ )** २




: कटिबंध (तापमानपट्टे)




पृथ्वीवरील हवादाबपट्टे व ग्रहीय वारे

१) ध्रुवीय वारे कोणत्या कटिबंधात येतात ?

२) उष्ण कटिबंधीय प्रदेशांमध्ये कोणता दाबपट्टा प्रामुख्याने आढळतो ?

३) ध्रुवीय वाऱ्यांची निर्मिती कोणत्या दाबपट्ट्यांशी निगडित आहे ?

**क) सुबक आकृती काढून नावे द्या. ( कोणतेही १ )** २

१) चंद्राची उपभू - अपभू स्थिती

२) लाटेची रचना

९. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही २ ) ६

१) सुदान प्रदेशातील कोणतेही तीन तृणभक्षक प्राणी लिहा. त्याच्या स्वसंरक्षणासाठी निसर्गाने कोणती व्यवस्था केली आहे ?

२) ग्रहीय वाऱ्यांचे प्रकार स्पष्ट करा.

३) ग्रहणांविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठीचे उपाय सुचवा.